क्रमांक:३६१/क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक: ७ जानेवारी, २०२२.

**:: कार्यालयीन आदेश ::**

या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/प्रतिनियुक्तीमुळे रिक्त झालेल्या **"कक्ष अधिकारी** (एस-१७-४७६००-१५११००) या पदावर श्रीमती स्ने. म. बांबोळे, सहायक कक्ष अधिकारी यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

श्रीमती बांबोळे यांना कक्ष अधिकारी पदावर तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहे.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे श्रीमती बांबोळे यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) श्रीमती बांबोळे यांना सदरहू पदोन्नती कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणारी विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहे. कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास, श्रीमती बांबोळे यांना सहायक कक्ष अधिकारी या पदावर पदावनत करण्यात येईल.

(ड) प्रतिनियुक्तीवर असलेले ज्येष्ठ कक्ष अधिकारी यांचे प्रत्यावर्तन झाल्यानंतर त्यांच्यासाठी कक्ष अधिकारी संवर्गात रिक्त पद उपलब्ध नसल्यास, श्रीमती बांबोळे यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

..२/-

(इ) कक्ष अधिकारी पदावर सरळसेवेद्वारे उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर, सरळसेवेच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या श्रीमती बांबोळे यांना पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. तथापि, पदोन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या कोटयामध्ये जर जागा शिल्लक असतील तर त्यांचा पदोन्नतीच्या कोटयामध्ये समावेश करण्यात येईल.

आदेशानुसार,

(सुभाष नलावडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

श्रीमती स्ने. म. बांबोळे, सहायक कक्ष अधिकारी.

**प्रतिलिपी :-**

१) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

४) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

५) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) वैयक्तिक नस्ती.

९) निवडनस्ती.